



प्रवाहाच्या विरूध्द दिशेला तेच पोहू शकतात ज्यांचे निर्धार ठाम असतात, ज्यांना कुठलेतरी ध्येय गाठायचे असते.
- महात्मा फुले

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



• वर्ष : ०३ • अंक : २०१ • पुणे • शनिवार, दि. ११ एप्रिल २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313


# सुनेत्रा पवार यांच्या जीवाला धोका

## रुपाली चाकणकरांवर गंभीर आरोप; SIT कडे तक्रारीने राजकारणात खळबळ



**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

राज्यभरात चर्चेत असलेल्या भोंदू अशोक खरात प्रकरणाने आता आणखी एक धक्कादायक वळण घेतले आहे. या प्रकरणाचा तपास करणाऱ्या विशेष तपास पथकाकडे (एसआयटी) बीड जिल्ह्यातील एका व्यक्तीने गंभीर तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीत राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या जीवाला धोका असल्याचा दावा करण्यात आला असून, हा धोका राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्याकडून असल्याचे नमूद केले आहे. या तक्रारीमुळे राजकीय वर्तुळात आणि पोलिस यंत्रणेमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित व्यक्तीने थेट एसआयटीकडे धाव घेत ही तक्रार नोंदवली आहे. अशोक खरात प्रकरणाशी संबंधित तपास सुरू असतानाच या नव्या तक्रारीमुळे तपासाची दिशा अधिक गुंतागुंतीची बनली आहे. तक्रारदाराने केलेल्या आरोपांमध्ये किती तथ्य आहे आणि किती खोडसाळपणा आहे, याची सखोल चौकशी करण्याची जबाबदारी आता एसआयटीवर आहे. या प्रकरणात राजकीय हेतू असण्याची शक्यताही नाकारता येत नाही. दरम्यान, अशोक खरात प्रकरणात पीडितांकडून येणाऱ्या तक्रारींचा ओघ वाढतच चालला आहे. एसआयटीने यासाठी विशेष हेल्पलाईन सुरू केली असून, या माध्यमातून दररोज अनेक तक्रारी नोंदवल्या जात आहेत. या तक्रारींमध्ये आर्थिक फसवणूक, महिलांचे शोषण यांसह कौटुंबिक वादांशी संबंधित मुद्देही समोर येत आहेत. या सर्व तक्रारींची सत्यता तपासणे हे तपास यंत्रणेसमोर मोठे आव्हान बनले आहे.

अशोक खरात याच्याविरोधातील तपासही दिवसेंदिवस अधिक गंभीर होत आहे. स्वतःला दैवी शक्ती असल्याचे भासवून त्याने अनेकांना फसवले असल्याचे आरोप आहेत. विशेषतः धार्मिक विधीच्या नावाखाली महिलांचे शोषण केल्याच्या तक्रारींमुळे हे प्रकरण अधिकच संवेदनशील बनले आहे. याशिवाय आर्थिक गैरव्यवहाराचेही अनेक धागेदोरे तपासात समोर येत आहेत. चौकशीदरम्यान अशोक खरात मानसिकदृष्ट्या खचल्याचेही समजते. मी इथून बाहेर पडेल असं वाटत नाही, माझं मरण इथेच आहे, असे वक्तव्य त्याने केल्याची माहिती आहे. त्याच्यावर आतापर्यंत 15 गुन्हे दाखल झाले असून, सध्या तिसऱ्या गुन्ह्याच्या चौकशीवर भर दिला जात आहे. फसवणुकीच्या एका गुन्ह्याची कबुली त्याने दिल्याचेही सूत्रांकडून सांगितले जात आहे, तर इतर गंभीर आरोपांची चौकशी सुरू आहे.

### प्रकरणात गुंतागुंत वाढण्याची शक्यता

**एकूणच, अशोक खरात प्रकरण आता केवळ एका गुन्ह्यापुरते मर्यादित राहिले नसून त्याला राजकीय आणि सामाजिक पैलूही प्राप्त झाले आहेत. नव्या तक्रारीमुळे या प्रकरणात आणखी गुंतागुंत वाढण्याची शक्यता आहे. पुढील काळात एसआयटीच्या तपासातून कोणते नवे खुलासे समोर येतात, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.**

### माझं मरण इथेच; भोंदूचा मानसिक तोल ढासळला

**नाशिकमधील चर्चित भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात तपासाला वेग आला असून, पोलिसांच्या सततच्या चौकशीमुळे खरात मानसिकदृष्ट्या खचल्याची माहिती समोर येत आहे. विशेष तपास पथकाकडून (एसआयटी) दररोज तासन्तास चालणाऱ्या चौकशीमुळे त्याच्यावर मोठा मानसिक ताण निर्माण झाल्याचे सांगितले जाते. या पार्श्वभूमीवर चौकशीदरम्यान त्याने, मी इथून बाहेर पडेल असे वाटत नाही, माझं मरण इथेच आहे, असे वक्तव्य केल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. अशोक खरातला अटक झाल्यापासून त्याच्याविरोधात एकामागोमाग एक गुन्हे दाखल होत आहेत. एका प्रकरणाची चौकशी पूर्ण होत नाही तोच दुसऱ्या प्रकरणात त्याला सामोरे जावे लागत आहे. सध्या एसआयटीकडून त्याची दररोज आठ ते दहा तास चौकशी होत असून, या प्रक्रियेमुळे त्याची मानसिक स्थिती ढासळल्याचे समोर आले आहे. आतापर्यंत त्याच्याविरोधात सुमारे 15 गुन्हे नोंदवण्यात आले असून, सध्या तिसऱ्या गुन्ह्याच्या तपासावर भर दिला जात आहे. तपासादरम्यान काही धक्कादायक बाबीही समोर आल्या आहेत. अशोक खरातने स्वतःला दैवी शक्ती असल्याचे सांगत अनेक महिलांना फसवले, तसेच धार्मिक विधीच्या नावाखाली त्यांच्यावर गैरवर्तन केल्याचे आरोप करण्यात आले आहेत. अनेक महिलांनी त्याच्यावर गंभीर स्वरूपाचे आरोप केले असून, या प्रकरणांचा तपास सुरू आहे. मात्र, या गंभीर आरोपांची कबुली त्याने अद्याप दिलेली नाही. याशिवाय आर्थिक गैरव्यवहाराचेही धागेदोरे तपासात समोर येत आहेत. दरम्यान, एसआयटीने अशोक खरात आणि त्याची पत्नी कल्पना खरात यांच्या नावावरील तीन बँक खाती गोठवली आहेत. नाशिकसह पुणे, मुंबई आणि अहिल्यानगरमधील आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी सुरू आहे. संशयास्पद व्यवहारांमुळे खरातच्या मालमत्तांवरही कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या प्रकरणात आर्थिक गुन्ह्यांचा तपासही अधिक गतीने सुरू आहे.**



# कर्मकांडांपेक्षा मनगटावर विश्वास ठेवा

**शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे**

**(दै. आरंभ पर्व)**

समाज प्रगतीच्या शिखरावर पोहोचत असताना, विज्ञान-तंत्रज्ञानाच्या जोरावर नवनवीन संधी निर्माण होत असताना, अजूनही अंधश्रद्धा आणि कर्मकांडांच्या जाळ्यात अडकलेली मानसिकता अनेक ठिकाणी पाहायला मिळते. शिक्षणाचा प्रसार वाढूनही अनेकजण यश, अपयश, आरोग्य, व्यवसाय किंवा वैयक्तिक आयुष्याशी संबंधित निर्णय घेताना स्वतःच्या कर्तृत्वापेक्षा शुभमुहूर्त, ग्रह-नक्षत्र आणि विविध विधींवर अधिक भर देताना दिसतात. या पार्श्वभूमीवर "कर्मकांडांपेक्षा मनगटावर विश्वास ठेवणे" ही काळाची गरज असल्याचे मत समाजातील जाणकारांकडून व्यक्त होत आहे. आजही अनेक ठिकाणी कोणतेही नवे काम सुरू करताना योग्य वेळ शोधणे, वास्तुदोष, ग्रहबाधा किंवा विविध धार्मिक विधी यांना अनावश्यक महत्त्व दिले जाते. काही वेळा या गोष्टी मानसिक समाधान देतात, परंतु त्याच गोष्टींवर अति अवलंबून राहिल्यास व्यक्तीची निर्णयक्षमता कमी होते. स्वतःच्या मेहनतीपेक्षा बाह्य घटकांवर विश्वास ठेवण्याची सवय लागल्यास व्यक्ती आत्मविश्वास गमावते आणि प्रत्येक गोष्टीसाठी कारणे शोधत राहते.

तज्ज्ञांच्या मते, यश हे कधीही केवळ नशिबावर अवलंबून नसते. यश मिळवण्यासाठी सातत्यपूर्ण मेहनत, योग्य नियोजन आणि चिकाटी या गोष्टी अत्यावश्यक असतात. शेतकरी पावसाची वाट पाहत असला तरी शेतीसाठी त्याला कठोर परिश्रम करावे लागतात. विद्यार्थी परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी अभ्यासाशिवाय पर्याय नसतो. कामगार, उद्योजक किंवा व्यावसायिक यशस्वी होण्यासाठी दिवस-रात्र मेहनत घेतात. ही सर्व उदाहरणे स्पष्ट करतात की, यशाचा पाया हा मनगटाच्या बळावर उभा असतो.

अपयशाच्या वेळी अनेकदा "नशीब साथ देत नाही", "वेळ खराब आहे" किंवा "ग्रहांची स्थिती प्रतिकूल आहे" असे म्हणत स्वतःची जबाबदारी टाळण्याची प्रवृत्ती वाढताना दिसते. मात्र, आत्मपरीक्षण करून स्वतःच्या चुका ओळखून त्यातून शिकण्याची वृत्ती अंगीकारली, तरच पुढील यशाचा मार्ग मोकळा होतो. अंधश्रद्धा व्यक्तीला कारणांमध्ये अडकवते, तर आत्मविश्वास त्याला उपाय शोधण्याची दिशा दाखवतो.

धर्म आणि परंपरा या आपल्या संस्कृतीचा अविभाज्य भाग आहेत. त्यांचा आदर राखणे आवश्यक आहे. मात्र, जेव्हा या परंपरा व्यक्तीच्या प्रगतीत अडथळा ठरतात, तेव्हा त्यांचा पुनर्विचार करणे तितकेच गरजेचे ठरते. कर्मकांडांचा अतिरेक टाळून त्यामागील मूळ विचार समजून घेणे आणि विवेकाने निर्णय घेणे ही आजच्या काळाची गरज आहे. नव्या पिढीसमोर मोठ्या संधी आहेत. शिक्षण, तंत्रज्ञान आणि माहितीच्या सुलभ उपलब्धतेमुळे आजची तरुणाई अधिक सक्षम झाली आहे. या पिढीने अंधानुकरणाला बळी न पडता स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवणे आवश्यक आहे. मेहनत, प्रामाणिकपणा आणि जिद्द या मूल्यांच्या आधारावर समाजात सकारात्मक बदल घडवता येऊ शकतो.

समाजात परिवर्तन घडवण्यासाठी मोठ्या चळवळींची गरज नाही, तर प्रत्येक व्यक्तीने स्वतःपासून सुरुवात करणे महत्त्वाचे आहे. यशासाठी कर्मकांडांवर अवलंबून राहण्यापेक्षा स्वतःच्या कष्टांवर विश्वास ठेवणे, अपयशातून शिकणे आणि सतत प्रयत्नशील राहणे हीच खरी प्रगतीची गुरुकिल्ली आहे. एकंदरीत, यशस्वी आणि सक्षम समाज घडवायचा असेल, तर अंधश्रद्धा आणि कर्मकांडांच्या पलीकडे जाऊन मनगटावर विश्वास ठेवणे अत्यावश्यक आहे. मेहनतीची जोड, जिद्दीची साथ आणि आत्मविश्वासाची ताकद यांच्या बळावरच व्यक्ती तसेच समाज उज्ज्वल भविष्याकडे वाटचाल करू शकतो.

# पुण्यात 'नो डीजे'; स्पिकरची परंपरा मोडणार

## आंबेडकरांची जयंती विचारांचा जागर करून साजरी होणार



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सामाजिक परिवर्तनाची प्रयोगशाळा समजल्या जाणाऱ्या पुणे शहरात यंदा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती 'नो डीजे' म्हणून साजरी केली जाणार आहे. हा ऐतिहासिक निर्णय शहरातील प्रमुख दलित संघटना, उत्सव समिती आणि कार्यकर्ते, तसेच ४० विविध संघटना, मंडळांनी मिळून घेतला आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती महोत्सव समितीच्या आवाहनाला प्रतिसाद देत भीमसेवा प्रतिष्ठान आणि स्थानिक कार्यकर्त्यांनी गेली २५ वर्षे सुरू असलेली स्पीकरची (डीजे) परंपरा यंदा कायमची बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती उत्सव समितीचे अध्यक्ष राहुल डंबाळे यांनी ही माहिती दिली. हा निर्णय रामभाऊ डंबाळे, रिपब्लिकन नेत्या सुवर्णा डंबाळे, सिद्धांत सुर्वे, प्रदीप कांबळे, निखिल बहुले, अविराज मराठे, नासीर खान या कार्यकर्त्यांनी एकमताने घेतला आहे. पुणे स्टेशन परिसरात अभिवादनासाठी येणाऱ्या अनुयायांची अलोट गर्दी लक्षात घेता, ध्वनिप्रदूषण टाळण्यासाठी आणि ज्येष्ठ नागरिक व रुग्णांना त्रास होऊ नये, म्हणून इतर मंडळांनीही स्पीकर लावू नये, असे आवाहन यावेळी करण्यात आले आहे. पुण्याचा 'नो डीजे' निर्णय महाराष्ट्रातील इतर शहरांसाठी दीपस्तंभ ठरणार असून, जयंती उत्सवाच्या एका नवीन पर्वाची ही सुरुवात मानली जात आहे. त्यामुळे गोंगाटापेक्षा यंदा शांततेच्या माध्यमातून विचारांचा जागर होणार आहे. यामुळे या निर्णयाचे पोलिस प्रशासनाकडून स्वागत केले जात आहे. मिरवणुकीतील मोठ्या आवाजाचा मानवी आरोग्यावर होणारा घातक परिणाम लक्षात घेऊन आणि नुकत्याच घडलेल्या दुर्दैवी घटनांपासून बोध घेत, यंदा स्पीकरवर होणारा अवाढव्य खर्च टाळून १,००० अनुयायांना महापुरुषांच्या विचारांची पुस्तके मोफत वाटली जाणार आहेत.

### ऐतिहासिक ३० फुटांचे बुद्धरूप आणि 'मूकपट'

**यावर्षीच्या उत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे ३० फुटांचे तथागतांचे भव्य बुद्धरूप असलेला विशेष देखावा, तसेच 'गोंगाटात विचार हरवू नका' हा संदेश देण्यासाठी तथागत बुद्ध, सम्राट अशोक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरील 'तीन पात्री मूकपट' आयोजित करण्यात आला आहे.**

# पुण्यातले पोलीसच फरार


## खंडणी उकळणे, ब्लॅकमेल करणे; पुण्यातील ६ पोलिसांवर बडतर्फीची टांगती तलवार, सोनाली हिंगेसहीत दोघे फरार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शहर पोलिस दलाची प्रतिमा मलिन करणाऱ्या सहा पोलिस कर्मचाऱ्यांवर बडतर्फीची कारवाई केली जाणार असल्याचा स्पष्ट इशारा पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिला आहे. खंडणी उकळणे, ब्लॅकमेल करणे आणि अधिकाराचा गैरवापर करणाऱ्यांना कोणतीही गय केली जाणार नसल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. मंगळवार पेठेतील एका नामांकित महाविद्यालयाच्या प्राचार्यांना पोक्सोअंतर्गत खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची भीती दाखवून सात लाख रुपयांची खंडणी उकळल्याप्रकरणी पोलिस उपनिरीक्षक अजित बडे, रिलस्टार सोनाली हिंगे आणि पोलिस कर्मचारी सुदाम तायडे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या तिघांना यापूर्वीच निलंबित करण्यात आले असून, त्यांच्या कृत्यामुळे पोलिस दलाची प्रतिमा धुळीस मिळाल्याचा ठपका ठेवत आता त्यांच्यावर बडतर्फीची कारवाई होणार



असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले. दरम्यान, वाघोली पोलिस ठाण्यातील आणखी एका प्रकरणात पोलिस हवालदार किरण अब्दागिरे, पोलिस शिपाई गणेश खाडे आणि किरण कांबळे यांनी आयटी अभियंता तरुण-तरुणीला सेक्स रॅकेटमध्ये अडकवण्याची धमकी देत दहा हजार रुपये उकळल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेत तरुणाला मारहाणही करण्यात आल्याचे समोर आले आहे. या तिघांवर पोलिस उपायुक्त सोमय मुंडे यांनी निलंबनाची कारवाई केली आहे. या प्रकरणाची तक्रार संबंधित तरुण-तरुणीने थेट पोलिस आयुक्तांकडे केल्यानंतर चौकशीचे आदेश देण्यात आले होते.



# सोलापूर रोडवरील अतिक्रमणांवर कारवाई का होत नाही?

**मिनाक्षी शिंदे - हडपसर**
**(दै. आरंभ पर्व)**

### नागरिकांचा संताप
### तात्काळ कारवाईची मागणी

हडपसर ते कवडीपाठ टोलनाका दरम्यान सोलापूर महामार्गावर वाढलेल्या अतिक्रमणांमुळे वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर बनला असून, पुणे महानगरपालिका अतिक्रमण विभागाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या मार्गावर मोठ्या प्रमाणावर पथारी व्यावसायिक, भाजीपाला विक्रेते तसेच कलिंगड विक्री करणारे टेम्पोचालक यांनी रस्त्याच्या कडेला आणि काही ठिकाणी थेट महामार्गावरच व्यवसाय थाटला आहे. त्यामुळे रस्त्याची रुंदी कमी होऊन वाहनांच्या हालचालींना अडथळा निर्माण होत असून, दिवसभर वाहतूक कोंडीचा सामना नागरिकांना करावा लागत आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, या अतिक्रमणांकडे पुणे महापालिका तसेच हडपसर क्षेत्रीय कार्यालयाच्या अधिकाऱ्यांकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. "वारंवार तक्रारी करूनही कोणतीही कारवाई होत नाही," अशी खंत नागरिकांनी व्यक्त केली. दरम्यान, **'दै. आरंभ पर्व'**च्या प्रतिनिधींनी संबंधित व्यावसायिकांशी संवाद साधला असता, "आम्ही हप्ते देऊन व्यवसाय करतो," असा धक्कादायक दावा काही विक्रेत्यांकडून करण्यात आला. या विधानामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

अधिकाऱ्यांची बघ्याची भूमिका कायम राहिल्यास या अतिक्रमणांमुळे अपघातांची शक्यता वाढत असून, एखादी जीवितहानी झाल्यानंतरच प्रशासन जागे होणार का, असा संतप्त सवाल नागरिकांकडून केला जात आहे. सदर प्रकरणी पुणे महानगरपालिकेने तातडीने कारवाई करून महामार्ग मोकळा करावा, तसेच जबाबदार अधिकाऱ्यांवरही योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.






## थोडक्यात पण महत्वाचे




### 'मंगलमुखी' – ट्रान्सजेंडर पोलीस अधिकारीची रहस्यमय क्राइम सिरीज

मुंबई (दै. आरंभ पर्व) : भारतातील प्रमुख डिजिटल एंटरटेनमेंट प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या हंगामा ओटीटीने आपली नवीन ओरिजिनल सिरीज 'मंगलमुखी' 9 एप्रिल 2026 रोजी लॉंच केली. ही वाराणसी आणि मुंबईच्या विरोधाभासी पार्श्वभूमीवर आधारित एक वास्तववादी आणि थरारक क्राईम ड्रामा सिरीज आहे. या सिरीजमध्ये एला डी वर्मा मुख्य भूमिकेत असून, नामिश तनेजा, रति पांडे आणि तान्या शर्मा देखील आहेत. सिरीजमध्ये एका तणावपूर्ण हत्या रहस्यासोबत ओळख, सन्मान आणि सहनशक्ती यांची भावनिक कथा सांगितली आहे. 'मंगलमुखी' ही सिरीज मंगल नावाच्या एका ट्रान्सजेंडर (तृतीयपंथी) पोलीस अधिकारीच्या जीवनावर आधारित आहे. तिला तिच्या विभागाकडून नेहमीच दुर्लक्षित केले गेले आणि खिल्ली उडवली गेली. पण जेव्हा तिला एका लोकप्रिय टीव्ही स्टारच्या कॅमेऱ्यासमोर झालेल्या रहस्यमय मृत्यूची पहिली मोठी केस मिळते, तेव्हा तिचे आयुष्य अचानक बदलते, जे तिला वाराणसी सोडून मुंबईच्या मनोरंजन क्षेत्राच्या अंधाऱ्या जगात खेचून आणते. सुरुवातीला एक अपघात वाटणारी ही घटना लवकरच एका थरारक तपासात बदलते, ज्यामुळे मंगलला केवळ न्यायासाठीच नव्हे, तर तिच्या संपूर्ण कारकिर्दीत नाकारल्या गेलेल्या मान्यतेसाठीही लढा द्यावा लागतो.

### कालव्याचे पाणी कोठे सुटणार? शेतकऱ्यांमध्ये संभ्रमावस्था


कदमवाकवस्ती (चंद्रकांत दुंडे) : खडकवासला धरणापासून येणारा नवीन मूठा कालवा हा भुयारीमार्गे खडकवासला ते फुरसुंगी लोणी काळभोर शिवेवर आणण्यात येणार आहे .त्याचे कामही सूरु झाल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. परंतु आता लोणी काळभोर येथील शेतकऱ्यांच्या शेतातून लोणी काळभोर फुरसुंगी शिवेवर न आणता पुढे लोणी काळभोर रामदरा रोडजवळ पाणी सुटणार असल्याची चर्चा सुरू झाल्याने लोणी काळभोर येथील पश्चिम भागातील शेतकरी तसेच कदमवाकवस्ती येथील शेतकरी व फुरसुंगी परीसरातील शेतकरी यांच्यामध्ये प्रचंड खळबळ माजली आहे.तसे झाल्यास या परिसरातील बोअरवेल,विहीरी कोरड्या पडतील परीणामी येथील शेती कोरडभाऊ होण्याची भीती येथील शेतकरी व्यक्त करत आहेत.तसेच या भागातील पाण्या परीस्थिती बिकट होईल.कालव्याचे पाणी नेमके कोठे सुटणार .लोणी काळभोर,फुरसुंगी शिवेवर की रामदरा रोडजवळ याबाबत नागरिकांमध्ये प्रचंड संभ्रमावस्था आहे.तरी शासनाने याबाबत खुलासा करणे आवश्यक आहे. याबाबत या परीसरातील शेतकरी राजकुमार काळभोर,प्रशांत वसंत काळभोर,माऊली पाटील काळभोर ,संजय लक्ष्मण काळभोर यांच्याबरोबर परीसरातील अनेक शेतकऱ्यांची चर्चा होऊन कालवा लोणी काळभोर फुरसुंगी शिवेवरच कालव्याचे पाणी सोडावे यासाठी शासनाकडे पत्रव्यवहार करणार असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.तसेच ही गोष्ट महाराष्ट्र केसरी राहुल काळभोर यांना सांगितली यावर राहुल काळभोर यांनी लवकरच आपण या संदर्भात शिरूर हवेलीचे आमदार मा.ज्ञानेश्वर उर्फ माऊली कटके तसेच दौंड तालुक्याचे आमदारांन राहुल कुल यांच्याशी चर्चा करुन तोडगा काढू असे सांगितले.

### निक इंडिया आणि अनन्या पांडे यांच्या पुढाकाराने मुलांचा उत्साह वाढला



पुणे (दै. आरंभ पर्व) : परीक्षांचा काळ जवळ आला की, संपूर्ण कुटुंबात तणावाचे वातावरण निर्माण होते. वाढत्या अपेक्षा आणि दबावामुळे मुलांच्या मानसिकतेवर परिणाम होतो. हीच बाब ओळखून निक इंडिया आणि अनन्या पांडेच्या 'सो पॉझिटिव्ह' पुढाकाराने एकत्र येत मुलांसाठी आणि पालकांसाठी प्रेशर को बोलो बाय या विशेष मोहिमेचे आयोजन केले आहे. निक इंडियाची सुरू असलेली मोहिम प्रेशर को बोलो बायचा भाग असलेला हा उपक्रम पालकांना आपल्या मुलांच्या अद्वितीय क्षमता ओळखून आणि तुलना करण्याऐवजी त्यांचा आत्मविश्वास वाढवून परीक्षेचा ताण कमी करावा, असे आवाहन करतो. 'सो पॉझिटिव्ह' अशा क्रियाकलापांच्या माध्यमातून तरूणांना अधिक अर्थपूर्ण व मनमोकळेपणाने संवाद साधण्यास प्रेरित करत आहे, ज्यासह अनन्या यांना मुले व त्यांच्या कुटुंबं भावनिक आरोग्याबाबत संवाद अधिक सहज व मोकळेपणाने करण्याची आशा आहे. या मोहिमेअंतर्गत विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यामध्ये अनन्या पांडे निकचे लोकप्रिय पात्र चिक्कू आणि बंटी यांच्यासोबत सहभागी झाल्या होत्या. मुलांनी फुग्यांवर आपल्या परीक्षेच्या चिंता लिहिल्या होत्या. अनन्या यांनी ते फुगे फोडून तणाव घालवण्याचे सोपे उपाय सर्वांना सांगितले. तसेच या खेळकर कृतीतून मुलांमधील अदृश्य तणाव कमी करून त्यांना आनंदी राहण्याचा संदेश देण्यात आला. अनन्या यांच्या सहभागाने परीक्षेदरम्यान येणारा तणाव दूर होण्यास मदत झाली आणि असे लहान बदल मोठे फरक घडवून आणू शकतात, हे दाखवून दिले.

### "राका" – अल्लू अर्जुन यांच्या वाढदिवशी शीर्षकाचे अनावरण



पुणे (दै. आरंभ पर्व) : भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वाधिक अपेक्षित सहकार्यांपैकी एकाच्या ऐतिहासिक क्षणी, एए22 x ए6 (AA22 x A6) च्या निर्मात्यांनी आज सकाळी 11 वाजता चित्रपटाचे अधिकृत शीर्षक "राका" जाहीर केले, ज्याद्वारे आयकॉन स्टार अल्लू अर्जुन यांच्या वाढदिवसानिमित्त एक प्रभावी घोषणा करण्यात आली. टायटल रिव्हीलसोबत एक प्रभावी टायटल पोस्टरही सादर करण्यात आले आहे, जे चित्रपटाच्या जगाची झलक देते. गडद, तीव्र आणि त्याच्या व्हिज्युअल टोनमध्ये प्राणी-सदृश भासणारे. ही दृश्यरचना एका भव्य कथानकाची पार्श्वभूमी तयार करते आणि एका शक्तिशाली तसेच अत्यंत रोचक विश्वाची झलक देते. भव्य फँटसी-ॲक्शन एंटरटेनर म्हणून सादर होणारा "राका" हा एक जागतिक सिनेमॅटिक स्पेक्टॅकल म्हणून उभा राहणार आहे, जो विविध बाजारपेठांतील प्रेक्षकांशी जोडला जाईल अशा पद्धतीने डिझाइन करण्यात आला आहे.

# 'सिल्व्हर मोटर्स–निसान'च्या भव्य शोरूमचे उद्घाटन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

दि. ७ एप्रिल २०२६ रोजी, पुण्यातील ऑटोमोबाईल क्षेत्रात १९३५ पासून विश्वासार्ह नाव असलेल्या सिल्व्हर जुबिली ग्रुपअंतर्गत कार्यरत सिल्व्हर मोटर्स – निसान या नव्या अत्याधुनिक शोरूमचे पुणे कॅम्प येथे भव्य उद्घाटन पार पडले. या शोरूमचे उद्घाटन निसान मोटर इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक श्री. सौरभ वत्स यांच्या हस्ते झाले. यावेळी निसान मोटर इंडियाचे डायरेक्टर श्री. अभिषेक अरोरा, श्री. विवेक पल्लिवाल, श्री. राकेश नेगी, श्री. मृन्मय गोगोई तसेच निसानची टीम उपस्थित होती. भारतामध्ये निसानची उपस्थिती १९६५ पासून असून, भारतीय सैन्याने विश्वास ठेवत निसान पॅट्रोल ६० (जोंगा) वाहनाची निवड केली होती. विविध युद्ध मोहिमांमध्ये हे विश्वासार्ह वाहन ठरले असून, निसान हे ब्रँड भारतात विश्वासार्हतेचे प्रतीक आहे. सिल्व्हर जुबिली ग्रुपचा वारसा १९३५ पासून पुणे कॅम्प परिसरात पेट्रोल पंप, कार शोरूम व सर्व्हिस स्टेशनच्या माध्यमातून



दृढपणे रुजलेला आहे. सिल्व्हर मोटर्स प्रायव्हेट लिमिटेडच्या व्यवस्थापकीय संचालक सौ. राजवर्धिनी संजय जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रकल्प साकारण्यात आला आहे. यावेळी मा. आमदार रवींद्र चव्हाण (भाजप प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र), मा. राजेश पांडे (प्रदेश सरचिटणीस, महाराष्ट्र), मा. आमदार संजय जगताप (भाजप प्रदेश सचिव, महाराष्ट्र), श्री. समरादित्य संजय जगताप, श्री. राजेंद्र पाटील, मा. खासदार अशोकअण्णा मोहोळ, मा. आमदार संग्रामदादा थोपटे, मा. आमदार दिलीपराव मोहिते, मा. आमदार रमेशअप्पा थोरात, मा. आमदार अशोकराव पवार, मा. आमदार अतुल बेनके, आमदार सुनील कांबळे, पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष श्री. वीरधवल जगदाळे, श्री. हरिभाऊ लोळे, श्री. अजय इंगळे, सौ. स्वरूपाताई थोपटे, सौ. सुजाताताई पवार, श्री. तुषार थोरात, सौ. प्राजक्ता दुर्गाडे, डॉ. दिगंबर दुर्गाडे (चेअरमन, पीडीसीसी बँक), उपाध्यक्ष सुनील चांदेरे, माजी अध्यक्ष रमेश थोरात तसेच सर्व संचालक मंडळ, संत सोपानकाका सहकारी बँकेचे चेअरमन व सर्व संचालक, अधिकारी व कर्मचारी, श्रीमती आनंदीकाकी चंद्रकांत जगताप (नगराध्यक्ष, सासवड नगरपालिका), सनदी अधिकारी डॉ. राजेंद्र चंद्रकांत जगताप (IDES), संरक्षण मंत्रालय – प्रिन्सिपल डायरेक्टर, सदर्न कमांड, सौ. केतकी शिर्के, सौ. नीताताई पाटील (पवार) सौ. गौरवी अतुल भोसले (चेअरमन, जागृती साखर कारखाना), संभाजी ब्रिगेडचे प्रवीणदादा गायकवाड, तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर, सर्व संचालक, अधिकारी व कर्मचारी तसेच सिल्व्हर मोटर्सचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवीन शोरूममध्ये अत्याधुनिक वाहनांची श्रेणी उपलब्ध असून, आधुनिक सुविधा व ग्राहक-केंद्रित सेवेमुळे पुणेकरांना उत्कृष्ट अनुभव मिळणार आहे. तसेच सिल्व्हर मोटर्स – निसान लवकरच पुणे शहर व जिल्ह्यात विस्तार करणार असल्याचे सांगण्यात आले.

## झूम ने भारतात झूम कॉन्टॅक्ट सेंटर सेवांच्या सुविधा वाढवल्या

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

झूम कम्युनिकेशन्स, इंक. (NASDAQ:ZM) यांनी आज जाहीर केले की भारतात झूम कॉन्टॅक्ट सेंटर साठी स्थानिक (नॅटिव्ह) फोन नंबरची सुविधा सुरू झाली आहे. ही सेवा महाराष्ट्र, तमिळनाडू (चेन्नई), मुंबई, दिल्ली NCR, कर्नाटक (बेंगळुरू) आणि आंध्र प्रदेश व तेलंगणा (हैदराबाद) या सहा टेलिकॉम सर्कलमध्ये उपलब्ध आहे. या सुविधेमुळे भारतातील कंपन्यांना ग्राहकांशी संपर्क साधणे अधिक सोपे होणार असून, नियमांनुसार आणि एआयच्या मदतीने उत्तम सेवा अनुभव देता येणार आहे. ही सेवा झूम इंडिया मार्फत दिली जाते. त्यांच्याकडे भारत सरकारच्या दूरसंचार विभागाचा (DoT) संपूर्ण भारतासाठी परवाना आहे. आता स्थानिक भारतातील नंबर उपलब्ध झाल्यामुळे कंपन्या त्यांच्या एजंट्स आणि कर्मचाऱ्यांच्या मदतीने क्लाऊड-आधारित कॉन्टॅक्ट सेंटर सेवा सहजपणे चालवू शकतात आणि स्थानिक नियमांचे पालन करू शकतात. झूम कॉन्टॅक्ट सेंटर हे एक कनेक्टेड प्लॅटफॉर्म आहे, जिथे व्हॉईस कॉल, व्हिडिओ, चॅट आणि इतर डिजिटल सेवा एकत्र मिळतात.

## क्रीडा कौशल्याला मिळणार नवी दिशा

### खडसे महाविद्यालयात १५ दिवसीय बॅडमिंटन शिबिराचे आयोजन

**मुक्ताईनगर (दै. आरंभ पर्व)**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये खेळाची आवड निर्माण व्हावी आणि त्यांच्यातील क्रीडा गुणांना वाव मिळावा, या उद्देशाने मुक्ताईनगर तालुका एज्युकेशन सोसायटी संचलित श्रीमती जी. जी. खडसे महाविद्यालयात १५ दिवसीय बॅडमिंटन कोचिंग कॅम्पचा मोठ्या उत्साहात शुभारंभ करण्यात आला. मंगळवार, ७ एप्रिल २०२६ पासून सुरू झालेले हे शिबिर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. शारीरिक व मानसिक आरोग्यावर भर आजच्या धावपळीच्या युगात विद्यार्थ्यांचे शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहावे, हा या शिबिराचा मुख्य हेतू आहे.



बॅडमिंटनसारख्या वेगवान खेळामुळे विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढून त्यांचा आत्मविश्वास वृद्धिंगत होईल, असा विश्वास महाविद्यालय प्रशासनाने व्यक्त केला आहे. तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि प्रत्यक्ष सराव या प्रशिक्षण शिबिरासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बॅडमिंटनपटू ओम तळेले यांची उपस्थिती लाभली आहे . ते खेळाडूंना खालील मुद्द्यांवर सखोल मार्गदर्शन करत आहेत: बॅडमिंटन खेळाचा इतिहास आणि उगम . मैदानाची (Court) तांत्रिक रचना आणि आवश्यक साहित्य. खेळाची मूलभूत कौशल्ये, विविध तंत्रे ( Techniques) आणि डावपेच. बॅडमिंटनमधील अद्ययावत नियम आणि प्रत्यक्ष सराव. सदर शिबिराचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एच. ए. महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा संचालक डॉ. प्रतिभा ढाके यांनी केले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अशा प्रकारच्या प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल पालकांनी आणि क्रीडाप्रेमींनी महाविद्यालयाचे कौतुक केले आहे. या शिबिरामुळे भविष्यात तालुक्यातून दर्जेदार बॅडमिंटन खेळाडू घडतील, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

## शून्यातून विश्व निर्माण करणारा 'खाकी'चा जिद्दी प्रवास!

### एका सामान्य शेतकरी कुटुंबातील तरुण पोलीस झाला

**अहिल्यानगर (दै. आरंभ पर्व)**

यश हे अपघाताने मिळत नाही, तर ते सातत्य, कष्ट, त्याग आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपल्या स्वप्नांवर असलेल्या अढळ विश्वासाचे फळ असते. याचाच प्रत्यय संगमनेर तालुक्यातील नांदुरखंदरमाळ येथील एका सामान्य शेतकरी कुटुंबातील तरुण ऋषभ यशवंत सुपेकर याने आणून दिला आहे. सलग सहा वर्षे अपयशाशी झुंज देत, पदोपदी होणाऱ्या टीकेला आपल्या कर्तृत्वाने उत्तर देत ऋषभ आता पुणे शहर पोलीस दलात दाखल झाला आहे. हा प्रवास केवळ एका नोकरीचा नसून, एका जिद्दी तरुणाच्या अस्तित्वाच्या लढाईचा विजय आहे.



ऋषभचे वडील श्री. यशवंत दशरथ पाटील सुपेकर हे एकेकाळी तळेगाव दाभाडे येथे नोकरीला होते. मात्र, काळाच्या ओघात कंपनी बंद पडली आणि हातातील काम गेले. हार न मानता ते आपल्या मायभूमीला परतले. पत्नीच्या साथीने त्यांनी वडिलोपार्जित कोरडवाहू शेती कसण्यास सुरुवात केली. निसर्गाची अवकृपा आणि बाजारभावातील चढ-उतार यामुळे उदरनिर्वाह कठीण होता, तरीही त्यांनी इतर ठिकाणी कष्ट करून आपल्या मुलांच्या शिक्षणात कधीच खंड पडू दिला नाही. ऋषभ आणि त्याच्या बहिणीला उच्च शिक्षित करण्यासाठी या शेतकरी दांपत्याने रक्ताचे पाणी केले. ऋषभचे प्राथमिक शिक्षण नांदुरखंदरमाळ येथे झाले. मात्र, माध्यमिक शिक्षणासाठी साकुरला जाणे हे एक मोठे आव्हान होते. घरची परिस्थिती बेताची, स्वतःचे वाहन नाही आणि सार्वजनिक वाहतुकीची सोय नाही. अशा वेळी सकाळी लवकर उठून, नाश्ता न करता रस्त्यावर मिळेल त्या वाहनाला हात दाखवत साकुर गाठायचे, हा ऋषभचा नित्यक्रम होता. अनेकदा वाहन न मिळाल्यास साकुर ते नांदुर हा कठीण डोंगर घाट आणि रस्ता त्याला मैलोन्मैल पायी तुडवावा लागला. सोबत कमलेश, बबलू आणि इतर मित्र असायचे, पण पोटातील भूक आणि पायातील थकव्यापेक्षा मनात शिक्षणाची ओढ मोठी होती.

पुढील शिक्षणासाठी ऋषभ आळेफाटा येथील ज्ञानमाता कॉलेजमध्ये दाखल झाला. तिथेच त्याने एनसीसी (NCC) जॉईन केली आणि मनाशी खूणगाठ बांधली की, "काहीही झाले तरी देशसेवेसाठी वर्दी मिळवायचीच!" स्वप्न मोठे होते, म्हणून मेहनतही मोठी हवी होती. आळेफाटा येथील भाग्यविधाता करिअर अकॅडमीमध्ये त्याने प्रवेश घेतला. भाग्यविधाता करिअर अकॅडमी मध्ये त्याला आशिष सुपेकर सर व उत्तम गोरडे सर यांचे मार्गदर्शन लाभले. गावातून शैक्षणिक बसने येणारा घरचा डबा हाच त्याचा आधार असायचा. सकाळी आलेली भाकरी रात्री खातानाही त्याला ती ताजी वाटायची, कारण त्यात आई-वडिलांच्या कष्टाची चव होती.

## जळगाव जिल्हा परिषदेला नव्या 'सीईओ'

### करिश्मा नायर यांची नियुक्ती, मीनल करनवाल यांची मुंबईला बदली

**जळगाव (दै. आरंभ पर्व)**

राज्यातील प्रशासकीय यंत्रणेत मोठे फेरबदल करण्यात आले असून, जळगाव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) मीनल करनवाल यांची बदली करण्यात आली आहे. त्यांच्या जागी नाशिक महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त करिश्मा नायर यांची नियुक्ती करण्यात आली असून, जळगाव जिल्हा परिषदेचे नेतृत्व आता पुन्हा एका तरुण आणि कार्यक्षम महिला अधिकाऱ्याकडे सोपवण्यात आले आहे.



२०१९ च्या बॅचच्या आयएएस अधिकारी असलेल्या मीनल करनवाल यांची नियुक्ती आता मुंबई येथील 'नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प' (पोकरा) च्या प्रकल्प संचालकपदी करण्यात आली आहे. जळगावमधील आपल्या कार्यकाळात त्यांनी आरोग्य, शिक्षण आणि ग्रामीण विकासाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली. विशेषतः एचपीव्ही (HPV) लसीकरण मोहीम आणि प्रशासकीय पारदर्शकतेसाठी त्यांनी घेतलेले निर्णय चर्चेत राहिले होते. जळगावच्या नूतन सीईओ करिश्मा नायर या २०२१ च्या बॅचच्या आयएएस अधिकारी आहेत.

# जळगावात अतिक्रमणातील भेदभावाविरोधात मनसे आक्रमक

### हॉकर्स झोनसाठी ठोस मागणी

**जळगाव-सागर नानोटे (दै. आरंभ पर्व)**

शहरातील अतिक्रमण कारवाईत होत असलेल्या कथित भेदभावाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने जळगाव महानगरपालिकेच्या आयुक्तांना निवेदन देत प्रशासनाला जाब विचारला आहे. खोटे नगर ते कालिका माता मंदिर या प्रमुख मार्गावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले असून, विशेषतः परप्रांतीय व्यापाऱ्यांकडून रस्त्यावर विविध साहित्य विक्री सुरू असतानाही अतिक्रमण विभागाकडून त्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप मनसेने केला आहे. याउलट, स्थानिक मराठी तरुण उपजीविकेसाठी छोटे-मोठे व्यवसाय करत असताना त्यांच्यावर मात्र कठोर कारवाई केली जात असल्याने शहरात तीव्र असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. "अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईत दुहेरी निकष लावले जात आहेत का?" असा सवाल उपस्थित करत मनसेने प्रशासनाच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त केली आहे.

या पार्श्वभूमीवर मनसेने हॉकर्स धोरणाबाबत सविस्तर भूमिका मांडत, शहरात नियोजित व कायदेशीर हॉकर्स झोन तातडीने निश्चित करण्याची मागणी केली आहे. शहरातील लघु व्यावसायिकांना योग्य जागा, मूलभूत सुविधा आणि कायदेशीर संरक्षण मिळावे, यासाठी हॉकर्स नियमावलीचे काटेकोर पालन करण्यात यावे, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. विशेषतः स्थानिक मराठी तरुणांसाठी स्वतंत्र व सुसज्ज हॉकर्स झोन



आखण्यात यावा, जेणेकरून त्यांना सन्मानाने व्यवसाय करता येईल, अशी ठाम मागणी करण्यात आली. मनसेने स्पष्ट इशारा देत म्हटले आहे की, "जोपर्यंत अतिक्रमण कारवाईत पारदर्शकता येत नाही आणि सर्वांवर समान निकष लावले जात नाहीत, तोपर्यंत हा प्रश्न सुटणार नाही." तसेच, स्थानिक मराठी हॉकर्सवर अन्याय होऊ दिला जाणार नाही आणि त्यांच्या हक्कासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेना ठामपणे पाठीशी उभी राहील, अशी ग्वाहीही यावेळी देण्यात आली. खोटे नगर ते कालिका माता मंदिर परिसरातील सर्व अतिक्रमणांचे समान निकषांवर पुनरावलोकन करण्यात यावे, तसेच परप्रांतीय व्यापाऱ्यांकडून होणारे बेकायदेशीर अतिक्रमण तातडीने हटवावे, अशी मागणी करत मनसेने प्रशासनाला कठोर शब्दांत इशारा दिला आहे. दरम्यान, प्रशासनाने या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल आणि गरज पडल्यास अतिक्रमण हटविण्याची कारवाई जनतेच्या सहकार्याने स्वतः हाती घेण्यात येईल, असा ,स्पष्ट इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. याप्रसंगी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष ॲड जमील देशपांडे, महानगराध्यक्ष विनोद शिंदे, उप महानगराध्यक्ष श्रीकृष्ण मेंगडे, उप महानगराध्यक्ष ललित शर्मा, चेतन पवार, प्रकाश जोशी, आशुतोष जाधव, राहुल चव्हाण, खुशाल ठाकूर, बादशहा शहा, अल्ताफ शहा,महिला सेनेच्या अनिता कापुरे,भूषण ठाकूर, हेमंत मराठी, यश पाटील, गोपाल कोळी, शुभम काळे, चिराग लोखंडे, चुनेस अत्तरदे, सोनू निमाडकर, ऋषी पाटील, साई पाटील, गौरव पाटील, दर्शन पाटील, पंकज बोरसे, रोहित कोळी, आदित्य गायकवाड, राहुल सोनवणे, पियुष जहा, धीरज काळे, श्याम मराठे, माया मराठे, अन्याय झालेले मराठी हॉकर्स उपस्थित होते.




दैनिक **आरंभपर्व**
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
शनिवार, दि. ११ एप्रिल २०२६






# सहा शाळांना सौर ऊर्जा प्रकल्पाचे लोकार्पण

**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**

हिवरे खुर्द ता.जुन्नर येथे मंगळवार दि. ०७ एप्रिल रोजी क्लीन एनर्जी एक्सेस प्रोग्रॅम अंतर्गत ऍपटीव्ह कंपोनेंटस इंडिया प्रायव्हेट लिमिटेड व आय. आय. ई. सी. यांच्या वतीने " सोलर प्लांट लोकार्पण सोहळा " पार पडला. यावेळी तालुक्यातील सहा जिल्हा परिषद प्राथमिक शाळांसाठी सोलर प्लांट देण्यात आले एपप्टिव्ह कंपनी चे अधिकारी संकेत जाधव, सागर वाव्हळ, आय.आय. ई. सी. चे सिनियर अधिकारी अमर यादव, सिनियर प्रोग्राम मॅनेजर अनंत जोशी, अधिकारी जायनवाट मनीष सेहरावत, समन्वयक तुषार बिनवडे, अंकुश कोकणे आदी मान्यवर पदाधिकारी




यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला. अध्यक्षस्थानी आय.आय.ई.सी. चे प्रमुख अधिकारी अमरनाथ यादव होते. तालुक्यातील हिवरे खुर्द, पाडळी, चिंचोली, घाटघर, सितेवाडी, करंजाळे येथील शाळांना ह्या उपक्रमाचा लाभ झाला. संगणक कक्ष तसेच शाळा यांना यामुळे विजेची सुविधा प्राप्त होणार आहे. सर्व अधिकारी यांचा सन्मानचिन्ह, शाल व गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. राज्य गुणवत्ता यादीत आलेले वेदांत विशाल येंधे व ओम संतोष शिर्के व मार्गदर्शक शिक्षक निलेश सरोदे यांचा देखील सन्मान करण्यात आला. यावेळी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी प्रतिक चन्नावार, सहाय्यक गटविकास अधिकारी विठ्ठल भोईर, गटशिक्षणाधिकारी अशोक लांडे, शिक्षण विस्तार अधिकारी विष्णू धोंडगे, केंद्रप्रमुख रविंद्र कुटे, जिल्हाध्यक्ष सुभाष मोहरे, चिंचोली शाळेचे युवराज मोहरे, पाडळी सितेवाडी शाळेचे होना गवारी, पंढरीनाथ लांडे, करंजाळे शाळेचे साहेबराव मांडवे, लक्ष्मण यंदे, घाटघर शाळेचे बाळासाहेब शिंदे, प्रशांत लोखंडे उपस्थित होते. शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सागर वायकर, उपाध्यक्ष दिपाली जाधव, सरपंच मनीष बर्डे, उपसरपंच लक्ष्मण वायकर, चिंचोलीचे सरपंच काशिद, दत्तूशेठ वायकर, अशोक वायकर, प्रकाश वायकर, रामदास येंधे, कृष्णा लोखंडे, केरभाऊ शिर्के, रोहिदास जाधव, मयूर वायकर, ग्रामसेवक विलास वायकर, निलेश औटी, अर्चना औटी, शितल वाकचौरे, वर्षा बर्डे, हायस्कूल शाळेचे मुख्याध्यापक मच्छिंद्र भोर, यशराज वायकर, पालक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. विकास मटाले, गुणवंतराव इंगळे, सुरेखा म्हस्के , वर्षा बर्डे यांनी संयोजन केले. मुख्याध्यापक अन्वर सय्यद यांनी प्रास्तविक केले. सुत्रसंचालन निलेश सरोदे यांनी केले. सुनील हाडवळे यांनी आभार मानले.

## थोडक्यात पण महत्वाचे

### संकल्प कॉलेज, नऱ्हे येथे फायर सेफ्टी अभ्यासक्रमांना प्रवेश सुरू

पुणे (आरंभ पर्व) : नऱ्हे येथील संकल्प कॉलेजमध्ये महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त व महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ (MSBTE) संलग्न फायर सेफ्टी आणि इंडस्ट्रियल सेफ्टी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख शिक्षण देण्याच्या उद्देशाने हे कोर्सेस उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या अंतर्गत ॲडव्हान्स डिप्लोमा इन इंडस्ट्रियल सेफ्टी (ADIS), ॲडव्हान्स डिप्लोमा इन इंडस्ट्रियल सेफ्टी अँड सिक्युरिटी मॅनेजमेंट (FF), डिप्लोमा इन फायर सर्व्हिस इंजिनिअरिंग (FR) तसेच ॲडव्हान्स डिप्लोमा इन फायर सेफ्टी इंजिनिअरिंग (FS) असे विविध अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. हे सर्व कोर्सेस औद्योगिक सुरक्षा, अग्निसुरक्षा, आपत्कालीन व्यवस्थापन आणि सुरक्षा नियमांचे प्रशिक्षण देणारे असून उद्योग क्षेत्रात त्यांना मोठी मागणी आहे. NCFSE +1 याशिवाय काही अभ्यासक्रमांसोबत B.Sc / इंजिनिअरिंग पदवी तसेच BA / B.Com करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळणार आहे. १२ वी उत्तीर्ण, कोणत्याही शाखेतील पदवीधर तसेच इच्छुक उमेदवारांना या कोर्सेससाठी प्रवेश घेता येणार आहे. संकल्प कॉलेज, मानाजीनगर, नऱ्हे (पुणे) येथे स्थित असून, आधुनिक सुविधा व अनुभवी मार्गदर्शकांच्या सहाय्याने विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण दिले जात आहे..अधिकाधिक विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे संस्थेचे संस्थापक निलेश गिरमे यांनी आवाहन केले आहे. अधिक माहितीसाठी 9588436325 / 9322293512 या क्रमांकावर संपर्क साधावा, असेही संस्थेच्या वतीने कळविण्यात आले आहे.

### महात्मा फुले द्विशताब्दी जयंती वर्षात त्यांचे साहित्य प्रकाशित करा

पुणे (आरंभ पर्व) : महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त देशभर व राज्यभर विविध कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरे केले जात आहेत. मात्र, या महत्त्वाच्या वर्षातही महात्मा फुले यांचे समग्र साहित्य शासनाच्या वतीने प्रकाशित झाले नसल्याची बाब समोर आली आहे. याबाबत तीव्र खंत व्यक्त करत पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे. उद्या महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती निमित्त होणाऱ्या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर शासकीय फोटो झिंको तसेच संबंधित शासकीय विभागांकडून महात्मा फुले यांच्या साहित्याची मागणी करण्यात आली असता, असे कोणतेही साहित्य उपलब्ध नसल्याची धक्कादायक माहिती समोर आली. यामुळे संताप व्यक्त करत वाडेकर यांनी संबंधित विभागाने तातडीने महात्मा फुले यांचे समग्र वाङ्मय तसेच त्यांच्याशी संबंधित सर्व साहित्य प्रकाशित करावे, अशी मागणी केली आहे. तसेच, राज्य शासनाच्या प्रकाशन विभागाचे प्रमुख या नात्याने मंत्री चंद्रकांत पाटील यांनी या प्रकरणात विशेष लक्ष घालून सर्व साहित्य तातडीने उपलब्ध करून द्यावे, अशी विनंतीही करण्यात आली आहे.

### आता ट्रेनमध्येही भेटणार जेवण




गुरुग्राम/बंगळूरू (आरंभ पर्व) : ixigo Trains आणि ConfirmTkt यांनी Swiggyसोबत भागीदारी करत 'फूड ऑन ट्रेन' सेवा अधिक सक्षम केली आहे. या सुविधेमुळे प्रवाशांना १६० हून अधिक रेल्वे स्थानकांवरील ४० हजारांपेक्षा जास्त रेस्टॉरंटमधून ताजे व आरोग्यदायी जेवण थेट सीट किंवा बर्थवर मागवता येणार आहे. प्रवासी ixigo किंवा ConfirmTkt ॲपमधील 'फूड ऑन ट्रेन' पर्यायातून PNR क्रमांक टाकून डिलिव्हरी स्टेशन निवडू शकतात. ही ऑर्डर ट्रेन येण्याच्या ४ दिवस आधीपासून ते ३० मिनिटे आधीपर्यंत देता येणार असून, रिअल-टाइम ट्रॅकिंग आणि 'डिलिव्हरी नाही तर पूर्ण परतावा'ही सुविधाही उपलब्ध आहे. या भागीदारीमुळे रेल्वे प्रवाशांना राष्ट्रीय ब्रँड्ससह स्थानिक खाद्यपदार्थांचेही विविध पर्याय मिळणार असून, संपूर्ण रेल्वे प्रवास अधिक सोयीस्कर आणि समाधानकारक करण्याचा कंपनीचा दावा आहे.

## iQOO विशेष ऑफर्ससह आपला सहा वर्षांचा प्रवास करतेय साजरा

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

उच्च-कार्यक्षमतेचा स्मार्टफोन ब्रँड iQOO आपला सहावा वर्धापनदिन एका मर्यादित कालावधीच्या वर्धापनदिन सेलसह साजरा करत आहे. ६ एप्रिल ते १० एप्रिल, २०२६ पर्यंत, ग्राहक Amazon.in आणि iQOO.in वर iQOO स्मार्टफोन्सवर आकर्षक ऑफर्सचा लाभ घेऊ शकतात. गेल्या सहा वर्षांपासून, iQOO भारतातील तरुण आणि तंत्रज्ञान-प्रेमी ग्राहकांना शक्तिशाली आणि कार्यक्षमतेवर आधारित नवनवीन उत्पादने देण्यास वचनबद्ध आहे. या प्रवासाच्या केंद्रस्थानी ७० लाखांहून अधिक 'क्वेस्टर्स'चा एक मजबूत समुदाय आहे, ज्यांच्या अभिप्रायामुळे उत्पादने




सुधारण्यास आणि विश्वास निर्माण करण्यास मदत होते. ग्राहक iQOO ई-स्टोअर आणि Amazon.in वर या ॲनिव्हर्सरी ऑफर्सचा लाभ घेऊ शकतात. ६ वर्षांच्या ॲनिव्हर्सरी सेल दरम्यान ग्राहकांसाठी आकर्षक ऑफर्स उपलब्ध आहेत: हा प्रीमियम फ्लॅगशिप तीन आकर्षक रंगांच्या पर्यायांमध्ये उपलब्ध होईल. मॅट ब्लॅक अल्फा एडिशन, टाइमलेस व्हाइट लेजेंड एडिशन आणि नवीन पॉवरपॅक्ड एपेक्स एडिशन.

## डॉ. विश्वासराव आरोटे यांना 'द ग्रेट इंडिया जर्नालिझम आयकॉन अवॉर्ड २०२६' प्रदान!

**(दै. आरंभ पर्व)**

पत्रकारितेतील उल्लेखनीय कार्याची दखल घेत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांना 'द ग्रेट इंडिया जर्नालिझम आयकॉन अवॉर्ड 2026' या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार सिनेअभिनेते संतोष पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी मनसेचे राज्य उपाध्यक्ष राजे पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवर, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते तसेच पत्रकार संघाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. विश्वासराव आरोटे यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून समाजातील विविध प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवला असून ग्रामीण भागातील समस्या, सामाजिक उपक्रम, शैक्षणिक




घडामोडी आणि जनहिताच्या मुद्द्यांना त्यांनी प्राधान्याने वाचा फोडली आहे.

त्यांच्या संपादकीय लेखनातून समाजप्रबोधन, सकारात्मक पत्रकारिता आणि वस्तुनिष्ठ वृत्तांकनाचा ठसा उमटला आहे. या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कार स्वीकारताना डॉ. आरोटे यांनी हा सन्मान पत्रकारितेच्या माध्यमातून कार्य करणाऱ्या सर्व सहकाऱ्यांचा असल्याचे सांगितले. समाजहितासाठी निःपक्षपाती पत्रकारिता करण्याचा संकल्प अधिक दृढ झाल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉ. विश्वासराव आरोटे यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे वातावरण उत्साहपूर्ण झाले असून उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचा गौरव केला.

# संकल्प कॉलेजमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू; विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी

**पुणे (वारजे माळवाडी) (दै. आरंभ पर्व)**

संकल्प प्रतिष्ठानच्या संकल्प कॉलेज ऑफ बीबीए अँड बीसीए येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून विद्यार्थ्यांसाठी करिअर घडविण्याची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. व्यवसाय व्यवस्थापन तसेच संगणक आणि तंत्रज्ञान क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हे कॉलेज आकर्षणाचे केंद्र ठरत आहे.



कॉलेजमध्ये बीबीए (Bachelor of Business Administration), बीसीए (Bachelor of Computer Applications) तसेच बी.एस्सी अंतर्गत विविध आधुनिक अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. यामध्ये बी.एस्सी (Computer Science), बी.एस्सी (Information Technology), बी.एस्सी (Computer Applications), बी.एस्सी (Artificial Intelligence & Machine Learning) आणि बी.एस्सी (Data Science) यांचा समावेश आहे.

याशिवाय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत बी.कॉम (IB) आणि बी.कॉम (BM) हे अभ्यासक्रम प्रस्तावित आहेत.

विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांना CET शिवाय थेट प्रवेशाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी ही अत्यंत मोठी संधी मानली जात आहे.

संस्थेचा DTE कोड १६२७४ असून सर्व प्रवेश प्रक्रिया शासन नियमांनुसार पार पडणार आहे.

कॉलेजमध्ये अनुभवी प्राध्यापकवर्ग, अद्ययावत शैक्षणिक सुविधा आणि विद्यार्थीकेंद्रित शिक्षण पद्धती यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जात आहे. आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित अभ्यासक्रमांमुळे विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्रात स्पर्धात्मक स्थान मिळण्यास मदत होत आहे.

याबाबत संस्थापक निलेश गिरमे म्हणाले, "आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळणे अत्यंत गरजेचे आहे. संकल्प कॉलेज हे विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी भक्कम व्यासपीठ असून येथील अभ्यासक्रम करिअर घडविण्यास उपयुक्त ठरतील."

अधिक माहितीसाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी ९०२२५७०७९१ किंवा ८६६८६५००२६ या क्रमांकावर संपर्क साधावा. कॉलेजचे ठिकाण डांगट एन्क्लेव्ह, सर्वे नं. १४०/६, एनडीए रोड, वारजे मालवाडी, पुणे येथे आहे. विद्यार्थ्यांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन आपल्या भविष्यास योग्य दिशा द्यावी, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

# सराईत मोटारसायकल चोरास अटक

**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**

जुन्नर व आंबेगाव तालुक्यातील मोटारसायकल चोरणाऱ्या सराईत चोरास स्थानिक गुन्हे शाखा व घोडेगाव पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्याकडून चोरीच्या चार मोटारसायकल जप्त करण्यात आल्या आहेत.

पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागात मंचर, घोडेगाव, नारायणगाव,ओतूर परिसरातून मोटरसायकल चोरी जाण्याचे प्रमाण वाढले होते. सदर मोटरसायकल चोरीच्या गुन्ह्यांना आळा घालण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला दिल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव शेलार, सहाय्यक फौजदार दीपक साबळे, हवालदार वारे, नवले सदर गुन्ह्यांचा समांतर तपास करत असताना



घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज प्राप्त करून पुढील तपास सुरू केला. सदर सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली असता प्रत्येक ठिकाणी तोच चोरटा असल्याचे दिसून आले. मिळालेल्या सीसीटीव्ही फुटेज वरून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस अंमलदार अक्षय नवले यांना गोपनीय बातमीदार मार्फत बातमी मिळाली की सदर सीसीटीव्ही फुटेज मध्ये दिसणारा व्यक्ती रेकॉर्डवरील मोटरसायकल चोर राहुल अशोक दाते रा. मंचर हा आहे. तसेच त्याच्यावर यापूर्वी देखील बरेच गुन्हे दाखल आहेत. त्याच्या ताब्यातील चोरीच्या मोटरसायकल घोडेगाव नारोडी फाटा येथे विक्रीसाठी येणार असल्याचे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गोपनीय बातमीदार मार्फत समजले त्यावरून गुन्हे शाखेच्या पथकाने तसेच घोडेगाव पोलिस स्टेशन कडील पथकाने सदर ठिकाणी सापळा लावून त्यास ताब्यात घेऊन त्याच त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव राहुल अशोक दाते,वय २५ रा. मंचर, ता.आंबेगाव असे सांगितले. त्याच्या ताब्यातून घोडेगाव, मंचर, नारायणगाव,ओतूर या ठिकाणाहून चोरीस गेलेल्या चार मोटारसायकल तसेच नारायणगाव येथून चोरीस गेलेला एक मोबाईल असा एक लाख ११ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पुढील तपास घोडेगाव पोलीस करत आहेत.

पोलीस अधीक्षक श्री संदीप सिंह गिल्ल, अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे सर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर,सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव शेलार,सागर पवार(घोडेगाव) सहायक फौजदार दीपक साबळे,हवालदार संदीप वारे,राजू मोमिन, अक्षय नवले घोडेगावचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश पवार, हवालदार अमरदीप वंजारी, विठ्ठल वाघ, नीलेश तळपे, सावंत, कांबळे, तनपुरे, लगड, वायदंडे. तसेच

## ग्रामपंचायत हातवळण, ता. दौंड जि. पुणे

**B1 पेपर नोटीस क्रमांक-१ सन २०२६/२७**

ग्रामपंचायत हातवळण, ता. दौंड, जि पुणे यांचेकडुन खालील नमूद केलेल्या कामांची निविदा B-1 निविदा पद्धतीने (दोन सीलबंद लिफाफा पद्धतीने जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निवेदेचा नमुना ग्रामपंचायत हातवळण ता. दौंड जि. पुणे यांच्याकडुन दिनांक ११/०४/२०२६ ते दिनांक १८/०४/२०२६ या कालावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यत देण्यात येतील व दिनांक दिनांक ११/०४/२०२६ ते दिनांक १८/०४/२०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत पोस्टाने समक्ष ग्रामपंचायत मध्ये स्वीकारले जातील. सदर सीलबंद निविदा मासिक सभे दिवशी / ग्रामपंचायत सोई नुसार उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकिय रक्कम | निविदा विक्री करण्याचा कालावधी | निविदा फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १) | जि.प.शाळा खेळ मैदान तयार करणे. | १००७२४/- | दिनांक ११/०४/२०२६ ते दिनांक १८/०४/२०२६ | २३६/- | १००७/- |
| २) | प्राथमिक आरोग्य केंद्र दुरुस्ती व सुधारणा करणे. | १५००००/- | | २३६/- | १५००/- |

निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे : १) कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे चा अधिकार ग्रामपंचायतीने राखुन ठेवला आहे. २) कोऱ्या निविदा फी ग्रामपंचायत हातवळण PDCC बँक शाखा वरवंड खाते क्र. ०९३००२५००००००६१ वर किंवा ग्रा.प. कार्यालयात रोख भरल्या नंतर उपलब्ध होतील. तसेच निविदा भरणे कामी आवश्यक अटी व शर्ती सोबत दिल्या जातील. ३) या पूर्वी केलेल्या कामांचे काम पूर्णत्वाचे दाखले जोडावेत. ४) इसारा रक्कम ग्रामपंचायत हातवळण ग्रामनिधी खाते पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा वरवंड खाते क्र. ०९३००२५००००००६१ च्या खाती भरल्याची पावती जोडण्यात यावी किंवा ग्रामपंचायत नावे धनादेश /डी.डी. जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही. (सु.बे ला इसारा रक्कमेत सूट देनेत येत आहे). ५) आपण तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा वेगवेगळा सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा प्रथम उघडण्यात येईल आपण सर्व नियमास पात्र झाल्या नंतर आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल. सदर निविदा बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करणेचा, कोणतीही निविदा स्विकारणेचा अथवा नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत हातवळण यांनी राखुन ठेवला आहे.

ग्रामपंचायत अधिकारी    सरपंच
ग्रामपंचायत हातवळण ता. दौंड जि. पुणे

## थोडक्यात पण महत्वाचे




## लिम्काचा नवा चेहरा अनन्या पांडे; सोशल मीडिया फीडचीही धुरा

नवी दिल्ली(आरंभ पर्व) : लोकप्रिय लाइम-लेमनी पेय लिम्काने अभिनेत्री अनन्या पांडे यांची ब्रँड ॲम्बेसेडर आणि सोशल मीडिया लीड म्हणून नियुक्ती केली आहे. या निर्णयामुळे ब्रँडच्या डिजिटल कंटेंटची संपूर्ण जबाबदारी आता अनन्या यांच्याकडे असणार आहे.'फिल द ताज़गी'या नव्या मोहिमेअंतर्गत अनन्या पांडे लिम्काच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर फ्रेश, उत्साही आणि संवादात्मक कंटेंट सादर करणार आहेत. त्यांच्या शैलीतून ब्रँडचा नवा आणि तरुणांना आकर्षित करणारा चेहरा समोर येणार आहे. लिम्काच्या वारशाला आधुनिक टच देत ब्रँड अधिक प्रभावी आणि सहभागी अनुभव देण्याचा प्रयत्न करत असून, या मोहिमेमुळे ग्राहकांना ताजेपणाचा नवा डिजिटल अनुभव मिळणार असल्याचा कंपनीचा दावा आहे.

## ह्युंदाई मोटर इंडिया लि.तर्फे क्रेटा समर एडिशन





पुणे (आरंभ पर्व) : ह्युंदाई मोटर इंडिया लि.तर्फे क्रेटा समर एडिशन व्हेरिएंटस सादर करण्यात आले आहेत. यामध्ये अनेक तंत्रज्ञान आणि सोयी सुविधांमध्ये सुधारणा करण्यात आल्या आहेत.मालकी अनुभव अधिक उंचावण्यासाठी डिझाईन केलेले क्रेटा समर एडिशन व्हेरिएंटस प्रगत तंत्रज्ञान,अधिक सुलभता आणि सुधारित सुरक्षिततेसाठी ग्राहकांच्या बदलत्या गरजांना प्रतिसाद देऊन मिड साईज एसयुव्ही सेगमेंटमध्ये ह्युंदाई क्रेटाचे निर्विवाद अग्रणी म्हणून असलेले स्थान अधिक मजबूत करतात.



## हवेलीतील पाणीटंचाईवर 'जलतारा' उपाय; प्रकल्प राबविण्याची गरज

उरुळी कांचन (आरंभ पर्व) : हवेली तालुक्यातील वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर गावागावात 'जलतारा' प्रकल्प राबविणे अत्यंत गरजेचे असल्याचे मत हवेली पंचायत समितीचे सभापती युवराज काकडे यांनी व्यक्त केले. 'जलतारा' प्रकल्पाच्या आढावा बैठकीत बोलताना त्यांनी सांगितले की, सध्या उन्हाळ्यामुळे विहिरींनी तळ गाठला असून अनेक ठिकाणी बोअरवेलही आटत आहेत. परिणामी नागरिकांना दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. या परिस्थितीत 'जलतारा' प्रकल्प प्रभावी उपाय ठरू शकतो. जलतज्ज्ञ डॉ. पुरुषोत्तम वायाळ यांनी या प्रकल्पाबाबत माहिती देताना सांगितले की, जमिनीतील पाण्याची पातळी वाढविणे व भूजल पुनर्भरण हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. पावसाचे पाणी साठवून ते जमिनीत मुरवण्याच्या पद्धतीमुळे भूजल पातळीत १० ते १५ फूट वाढ होऊ शकते. या योजनेमुळे शेतीला वर्षभर सिंचनाची सुविधा उपलब्ध होण्यासोबतच अतिवृष्टीमुळे पाणी साचण्याचा धोका कमी होणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, हा प्रकल्प शासनस्तरावर मान्यतेच्या प्रतीक्षेत असला तरी आमदार ज्ञानेश्वर कटके यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक संस्था, CSR कंपन्या आणि ग्रामपंचायतींच्या सहकार्याने हवेली तालुक्यात तो राबविण्याचा विचार सुरू असल्याचे काकडे यांनी सांगितले. तसेच पाणीटंचाई दूर करण्यासाठी स्थानिक तरुण शेतकऱ्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

## रेस्टॉरंट वीक इंडियाचे दमदार पुनरागमन; विशेष डायनिंग फेस्टिवल




मुंबई (आरंभ पर्व) : देशातील अग्रगण्य डायनिंग फेस्टिवल 'रेस्टॉरंट वीक इंडिया' तब्बल १० वर्षांनंतर पुन्हा एकदा एप्रिल २०२६ मध्ये आयोजित करण्यात येणार आहे. कोटक सॉलिटेअरच्या सहयोगाने हा फेस्टिवल २४ एप्रिल ते ३ मेदरम्यान मुंबई, दिल्ली-एनसीआर आणि बेंगळुरू येथे पार पडणार आहे. या फेस्टिवलमध्ये ५५ हून अधिक नामांकित रेस्टॉरंट्स सहभागी होणार असून, प्रत्येक ठिकाणी खास थ्री-कोर्स प्रिक्स-फिक्स मेनू सादर केला जाणार आहे. ग्राहकांना लंचसाठी १,५०० रुपये आणि डिनरसाठी १,८०० रुपयांमध्ये हा अनुभव घेता येणार आहे. कोटक सॉलिटेअर कार्डधारकांसाठी आगाऊ बुकिंग आणि अतिरिक्त क्युरेटेड कोर्ससारख्या विशेष सुविधा देण्यात येणार आहेत. या उपक्रमामुळे भारतातील बदलत्या खाद्यसंस्कृतीचा अनुभव अधिक समृद्ध पद्धतीने घेता येणार असल्याचा आयोजकांचा विश्वास आहे. रेस्टॉरंट वीक इंडियाच्या या नव्या आवृत्तीत खवय्यांना विविध शहरांतील निवडक आणि आधुनिक रेस्टॉरंट्सची खास ओळख करून देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

## ..तर बारामतीत प्रचाराला जाण्याबाबत ठरवू: खासदार सुप्रिया सुळे

पंढरपूर (आरंभ पर्व) : मी एक मतदार म्हणून बारामतीला मतदानासाठी जाणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसकडून प्रचाराबाबत विचारणा झाल्यास निर्णय घेईन. शेवटी 'रिश्ते मायने रखते है', असे खासदार सुप्रिया सुळे यांनी सांगितले. शुक्रवारी त्या श्री विठ्ठल दर्शनासाठी पंढरपुरात आल्या होत्या. दर्शनानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. सुनेत्रा पवार यांच्या विजयाच्या मताधिक्याबाबत विचारले असता, "महाराष्ट्रातील बळीराजाला सुख, शांती आणि समाधान मिळावे, एवढीच विठ्ठलाकडे प्रार्थना केली," असे सांगत त्यांनी थेट उत्तर टाळले.

# दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सेवेकरिता कटिबद्ध : ॲड. आ. राहुल कुल

**दौंड (दै. आरंभ पर्व)**




स्व.सुभाष अण्णा कुल मतिमंद व बहुविकलांग मुलांची विशेष शाळा दौंड,या शाळेत विशेष मुलांच्या डिजिटल वर्गाच्या उद्घाटन प्रसंगी दौंड विधानसभाचे आमदार राहुल दादा कुल यांच्या शुभहस्ते उद्घाटन करण्यात आले याप्रसंगी बोलत असताना दिव्यांग विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी सोडून त्यांना योग्य न्याय देण्यासाठी मी कधीही कटिबद्ध राहील असे आश्वासक उद्गार आमदार यांनी केले. क्लीन सायन्स अँड टेक्नॉलॉजी लिमिटेड एम.आय.डी.सी कुरकुम यांच्या सामाजिक दायित्व फंडातून सुभाष अण्णा कुल मतिमंद व बहुविकलांग मुलांची विशेष शाळेला डिजिटल इंटरॅक्टिव्ह पॅनल तीन संच भेट दिला श्री.कोकिळा कटारिया आपल्या देणगी तुन डिजिटल वर्ग तयार करून दिला तसेच सांस्कृतिक कार्यक्रम, आदर्श विद्यार्थी सन्मान, दाता सन्मान कार्यक्रम तसेच विद्यार्थ्यांना पुस्तक वाटप असा संयुक्त कार्यक्रम याप्रसंगी शाळेच्या वतीने घेण्यात आला या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री.आप्पासाहेब पवार(माजी सभापती प स दौंड), मुलांना सांभाळणे त्यांचे संगोपन करणे हे मोठं काम आहे त्यातून मिळणारा आनंद हा खूप मोठा असतो, पालक शिक्षक आणि मदत करणाऱ्या मान्यवरांचे आप्पासाहेबांनी कौतुक केले कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे,श्रीमती छायाताई दिपक थोरात (उपनगराध्यक्ष दौंड),श्री योगेशभैया कटारिया(गटनेते नगरपालिका दौंड)श्री गणेश जगदाळे (सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती दौंड), विठ्ठल थोरात(ए.जी.एम.क्लीन सायन्स अँड टेक्नॉलॉजी कुरकुम), संदीप हेंद्रे (सीनियर एज्युकेटिव्ह असोसिएट क्लीन सायन्स), श्री. प्रशांत भंडारी, श्री संजय शिंदे,बळीराम चौगुले(असोसिएट मॅनेजर क्लीन सायन्स) श्री. वसीम भाई शेख(नगरसेवक), हर्ष विधाते (असोसिएट क्लीन सायन्स),संदीप त्रिभुवन (असोसिएट मॅनेजर क्लीन सायन्स), श्री.सतीशभाऊ थोरात (प.महा.युवा नेते आरपीआय), सौ.नीताताई वाघमारे (पोलीस पाटील लिंगाळी), श्री नवीन वाडिया श्री निखिल काळे, श्री सौरभ चव्हाण, श्री. जयाबाई गौरे (ग्रामपंचायत सदस्य लिगाळी), नागसेन धेंडे,नगरसेवक श्री. अमोल आप्पा काळे , नगरसेवकराजू बारवकर,श्री.सागर जगताप (नगरसेवक), श्री.हरिभाऊ ठोंबरे, श्री. तेजस भाऊ कांबळे, मिलिंद साळवे, सचिन कुलथे, निखिल स्वामी,शाळेचे विद्यार्थी पालक , शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा विजया राठोड , आदर्श पालक फिलिप दाखले, सह शिक्षक सह आदी मान्यवर उपस्थित होते. दाता सन्मान म्हणून निवड केलेले सन्मान आर्थिक. क्लीन सायन्स अँड टेक्नॉलॉजी एमआयडीसी कुरकुंभ हेमलता परदेशी रामेश्वर बद्रीनारायण मंत्री चैतन्य दूध डेरी, महेश वसंत कदम ,दत्तात्रेय संपत वाघोले,प्रियंका अतुल पाटील नितीन जयसिंग वागस्कर महेश पवार, डॉ.महेंद्र शांतीलाल मनोत, न्यू झोपडपट्टी सुरक्षा विकास दल डॉ. संजय गणेश इंगळे तेजस राजेंद्र कांबळे शहाणाज इब्राहिम शेख ऐश्वर्या शासन फाउंडेशन डॉ. प्रीती दीपक जाधव विजयकुमार ज्ञानदेव बोधे तर चिरंजीव प्रणव दिगंबर शिंदे यांना आदर्श विद्यार्थी म्हणून गौरवण्यात आले.

**चि. रेश्मा शिवाजी बर्थडे, चि. आश्विन दाखले,चि. स्वप्निल पवार यांनी सांस्कृतिक कार्यक्रमात विशेष भाग घेतला कार्यक्रम प्रसंगी सर्व शिक्षक, मुख्याध्यापक, शिक्षक इतर कर्मचारी उपस्थित होते गिरीमल्ला हिप्परगी, प्रशांत कदम, संजय बनसोडे, विनोद मराठे, विक्रम शेलार, संतोष भंडारी शुभम भंडारी, विशाल करनेवाल,अविनाश कवठे, निलेश गोराडे, नितीन गुणवरे, संजय बनसोडे, वैभव शेलार सह सुकेस्विनी अवचार, मोनिका गायकवाड, ससले मॅडम, सह सर्व कर्मचारी उपस्थित होते सूत्रसंचालन श्री दिगंबर पवार यांनी केले तर आभार श्री दिनेश बत्तीसा आणि गणेश हाके यांनी मांडले.**

## 'पिक्चर बॉईज'चा धमाकेदार टीझर लाँच

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

उन्हाळ्याच्या सुटीत कॉमेडीचा सुखद अनुभव देणाऱ्या पिक्चर बॉईज या चित्रपटाचा टीझर लाँच करण्यात आला आहे. १५ मे रोजी हा चित्रपट सर्वत्र प्रदर्शित होणार असून, चित्रपटांमध्ये हिरो होण्यासाठी धडपडणाऱ्या दोन तरूणांची धमाल गोष्ट या चित्रपटात पाहता येणार आहे.



त्रिमूर्ती फिल्म्सनं 'पिक्चर बॉईज' या चित्रपटाची निर्मिती केली आहे. रवी पांडुरंग पंडितपवार, राजा पांडुरंग पंडितपवार हे या चित्रपटाचे निर्माते असून शिवाजी केशव पाटील हे सहनिर्माते आहेत. चित्रपटाची कथा, पटकथा, संवादलेखन आणि दिग्दर्शन निलेशसिंह राजपूत यांनी केलं आहे. मंदार चोळकर, सुनील दोडगे, संध्या-प्रनिकेत यांनी लिहिलेल्या गीतांना वरुण लिखाते आणि संध्या-प्रनिकेत यांनी संगीतबद्ध केले आहे. सुप्रसिद्ध गायक आनंद शिंदे, जसराज जोशी, स्वप्नील गोडबोले, वरुण लिखाते, एल. के. लक्ष्मीकांत यांनी चित्रपटातली गाणी गायली आहेत. विनोद पाटील यांनी छायांकन, रोहन पाटील यांनी संकलनाची जबाबदारी निभावली आहे. आनंद शिंदे, जसराज जोशी, स्वप्नील गोडबोले, वरुण लिखाते, एल. के. लक्ष्मीकांत यांनी चित्रपटातली गाणी गायली आहेत. प्रतीक लाड, हंसराज जगताप, अरबाज शेख, पवन चुरे, घनश्याम दरोडे (छोटा पुढारी), प्रिया तुळजापूरकर, सूरज पाटील, किरण पाटील, नम्रता पोटे, निभिया शर्मा, सिद्धेश्वर झाडबुके, प्रशांत तपस्वी, मिलिंद दास्ताने, विजय खंदारे, साक्षी पंडितपवार, विजय गिते, अंकिता राऊत अशी नव्या जुन्या कलाकांची फळी चित्रपटात आहे.

## मॅटकेअर पुणेतर्फे 'जननी आरोग्य शिबिरा'चे उद्घाटन

### *महिला आरोग्य व प्रसूतीपूर्व सेवांपर्यंत पोहोच वाढवणे हा उद्देश*

**पुणे (दै. आरंभ पर्व)**




मॅटकेअर मॅटर्निटी अँड चाइल्ड हॉस्पिटलच्या पहिल्या वर्धापनदिनानिमित्त, मॅटकेअर पुणेतर्फे सिम्बायोसिस ऑडिटोरियम, क्लोव्हर पार्क, विमान नगर, पुणे येथे 'जननी आरोग्य शिबिरा'चे उद्घाटन करण्यात आले आहे. ही उपक्रमणा पुणे ओबीजिवाय सोसायटी, एनएमओ तसेच रोटरी क्लब यांच्या सहकार्याने राबविण्यात येत असून, पुण्यातील महिला आणि गर्भवती मातांसाठी वेळेवर, तज्ज्ञ व विशेष उपचारांची उपलब्धता वाढवण्याच्या मॅटकेअरच्या सातत्यपूर्ण वचनबद्धतेचे हे द्योतक आहे. यापैकी एक आरोग्य शिबिर मॅटकेअर पुणे, कॉमन विंग बी, क्रमांक २३२, एच नंबर १-२, आनंद एमरल्ड एसआर, विमान नगर रोड, पुणे, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन भारत सरकारचे केंद्रीय कॅबिनेट मंत्री मनसुख मांडविया यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी एएनसी हँडबुकचे प्रकाशन केले तसेच पुणे आणि परिसरातील भागांमध्ये आयोजित होणाऱ्या १०० प्रसूतीपूर्व शिबिरांच्या नेटवर्कचा औपचारिक शुभारंभ केला. याप्रसंगी इंदिरा आयव्हीएफचे मॅनेजिंग डायरेक्टर नितिज मुर्डिया, मॅटकेअरचे वरिष्ठ प्रतिनिधी — मॅटकेअरचे सीईओ डॉ. निखिल यादव, मॅटकेअर पुणे येथील स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. प्रविण ठोकळ, मॅटकेअरच्या नॅशनल निओनॅटल हेड डॉ. वृशाली बिचकर, मॅटकेअरचे मेडिकल सुपरिंटेंडेंट व इंदिरा आयव्हीएफचे झोनल बिझनेस डायरेक्टर डॉ. अमोल लुण्कड़, तसेच मॅटकेअरच्या फॅसिलिटी डायरेक्टर डॉ. इशिता लुण्कड़ उपस्थित होते. 'जननी आरोग्य शिबिरा'च्या माध्यमातून पुण्यात एका दिवसात १०० प्रसूतीपूर्व शिबिरांद्वारे महिलांपर्यंत आणि समुदायापर्यंत मोफत प्रसूतीपूर्व तपासणी व महिला आरोग्य सल्ला पोहोचवण्यात येणार आहे. त्याचबरोबर एएनसी हँडबुकच्या माध्यमातून गर्भवती मातांना सातत्यपूर्ण मार्गदर्शन मिळणार आहे. या सर्वसमावेशक उपक्रमाद्वारे मॅटकेअर पुणे येथे मातृत्व आरोग्याबाबत जनजागृती वाढवणे, प्रतिबंधात्मक काळजीला प्रोत्साहन देणे तसेच वेळेवर निदानाला चालना देणे, असा उद्देश ठेवण्यात आला आहे.

केंद्रीय कॅबिनेट मंत्री मनसुख मांडविया यांनी सांगितले की, १०० प्रसूतीपूर्व शिबिरे आणि एएनसी हँडबुकसह जननी आरोग्य शिबिराची सुरुवात ही मातृ आरोग्यसेवांच्या पुरवठ्यातील एक परिवर्तनकारी पाऊल आहे. सार्वजनिक–खाजगी भागीदारीद्वारे अत्यावश्यक आरोग्य सेवा कशा प्रकारे समुदाय पातळीपर्यंत पोहोचवता येतात, याचे हे उत्तम उदाहरण असून, यामुळे भारतातील मातृ आरोग्य पायाभूत सुविधा अधिक मजबूत होतील.

## डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलचा अत्याधुनिक नेत्ररुग्णालयाचे उद्घाटन

**मोशी (दै. आरंभ पर्व)**




महाराष्ट्रातील वाढत्या उपस्थितीला अधिक बळकटी देत, डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलने आज मोशी येथे अत्याधुनिक नेत्रसेवा केंद्राचे उद्घाटन केले. पुणे महानगर परिसरातील वेगाने विकसित होत असलेल्या भागातील नागरिकांना प्रगत आणि सर्वसमावेशक नेत्रसेवा उपलब्ध करून देणे हा या केंद्राचा उद्देश आहे.

उद्घाटनाच्या निमित्ताने, ३१ मे २०२६ पर्यंत सर्व रुग्णांसाठी मोफत सर्वसमावेशक नेत्र तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे, ज्यामुळे लवकर निदान आणि प्रतिबंधात्मक काळजीला प्रोत्साहन मिळेल. या केंद्राचे उद्घाटन पिंपरी-चिंचवडचे माजी महापौर श्री. नितीन काळजे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलच्या वरिष्ठ नेतृत्वातील डॉ. वंदना जैन (चीफ स्ट्रॅटेजी ऑफिसर) आणि श्री. राहुल अग्रवाल (चीफ ऑपरेटिंग ऑफिसर) तसेच वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

४,२०० चौरस फूट क्षेत्रफळावर पसरलेले हे केंद्र आधुनिक पायाभूत सुविधा आणि प्रगत तंत्रज्ञानाच्या साहाय्याने रुग्णकेंद्रित सेवा देण्यासाठी विशेषतः डिझाइन करण्यात आले आहे. या रुग्णालयात मोतीबिंदू, रिफ्रॅक्टिव्ह (LASIK), कॉर्निया, ग्लॉकोमा, रेटिना आणि बाल नेत्रचिकित्सा यांसारख्या सर्व सेवा उपलब्ध आहेत. तसेच एकाच छताखाली फार्मसी आणि ऑप्टिकल सेवा उपलब्ध करून देत संपूर्ण नेत्रसेवा प्रदान केली जाते. अनुभवी नेत्रतज्ज्ञ आणि प्रशिक्षित वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या टीमद्वारे उच्च दर्जाची सेवा आणि उत्तम उपचार परिणाम सुनिश्चित केले जातील.

डॉ. वंदना जैन (चीफ स्ट्रॅटेजी ऑफिसर) यांनी सांगितले, "डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलमध्ये आमचा मुख्य भर प्रगत नेत्रसेवा अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्यावर आणि उच्च दर्जाची वैद्यकीय गुणवत्ता राखण्यावर आहे. मोशी केंद्र हे या वेगाने विकसित होणाऱ्या भागातील रुग्णांपर्यंत विशेष सेवा पोहोचवण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल आहे."

श्री. राहुल अग्रवाल (चीफ ऑपरेटिंग ऑफिसर) म्हणाले,"आम्ही रुग्णकेंद्रित सुविधा उभारण्यावर लक्ष केंद्रित करत आहोत, ज्या मजबूत क्लिनिकल प्रणाली आणि उत्कृष्ट व्यवस्थापनावर आधारित आहेत. हे केंद्र उच्च दर्जाचे उपचार परिणाम आणि उत्कृष्ट रुग्ण अनुभव देण्यासाठी डिझाइन केले आहे."

## क्रिकेटच्या मोठ्या हंगामात सोशल तर्फे दुसरा स्टेडियम २०२६

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

क्रिकेटचा सर्वात मोठा हंगाम सुरू होत असताना सोशल ने मॅच डे डेस्टीनेशनचा अनुभव घेण्यासाठी 28 मार्च ते 31 मे 2026 दरम्यान दुसरास्टेडियम उपक्रम ग्राहकांसाठी पुन्हा आणला आहे.याअंतर्गत संवादात्मक फॉरमॅट सह क्रिकेट बघण्याचा अनोखा अनुभव ग्राहकांना मिळेल. याचबरोबर भारतातील लोकप्रिय टीम्सने प्रेरित विशेष मेन्यू देखील उपलब्ध असेल.यामध्ये राजस्थान बॅलेस्टिक भजियाज्,हैदराबाद ओजी हलिम बिर्याणी,लखनौ भारवान गलौटी,बंगळुरू ओजी स्टेडियम सामोसा,पंजाब सिक्सर छोले भटोरे,गुजरात फरसाण प्लॅटर,मुंबई वडा प्लॅटर,दिल्ली मंच



मोमोज्,कोलकाता फिले-ओ-फिश बर्गर यासारख्या चविष्ट पदार्थांचा समावेश आहे.यावर्षीचे वैशिष्टय म्हणजे इंटरॲक्टिव्ह मोबाईल क्रिकेट गेम.दुसरा स्टेडियम 2026 अनुभव हा पुणे,मुंबई,दिल्ली-एनसीआर,बंगळुरू,हैदराबाद,कोलकाता,लखनौ,चंदीगड आणि देहरादून मधील सोशल आऊटलेटसमध्ये मिळणार आहे.

# नाशिक भूषण पुरस्कार सोहळा संपन्न; महिला व युवा उद्योजकांचा गौरव

**पुणे (दै. आरंभ पर्व)**




आनंदी युनिव्हर्स फाउंडेशन यांच्या वतीने आयोजित "नाशिक भूषण पुरस्कार सोहळा 2026" हा उपक्रम नाशिक येथे मोठ्या उत्साहात आणि दिमाखात पार पडला. हा सोहळा विशेषतः महिला उद्योजक आणि युवा उद्योजकांना प्रोत्साहन देणारा प्रेरणादायी उत्सव ठरला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री स्वरा राजपूत यांनी उपस्थित राहून सोहळ्याची शोभा वाढवली. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष आकर्षण प्राप्त झाले आणि उपस्थितांना प्रेरणा मिळाली. संस्थेचे अध्यक्ष व कार्यक्रमाचे मुख्य संयोजक गणेश रामदास विटकर यांच्या नेतृत्वाखाली हा भव्य सोहळा यशस्वीरीत्या पार पडला. यावेळी गोदा इंटरटेनमेंटचे दिलीप जाधव, सुप्रसिद्ध निवेदक गणेश मोढवे तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उद्योजक, कृषी तज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सोहळ्यात महिला उद्योजकांनी व्यवसाय क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचा विशेष गौरव करण्यात आला. घर आणि व्यवसाय यांचा समतोल साधत त्यांनी मिळवलेले यश हे समाजासाठी प्रेरणादायी ठरले. तसेच युवा उद्योजकांनी नवीन तंत्रज्ञान, नवकल्पना आणि आधुनिक व्यवसाय पद्धतींचा वापर करून नाशिकच्या नावाला राज्यभरात नवी ओळख दिली आहे. "नाशिक भूषण पुरस्कार 2026" च्या माध्यमातून उद्योजकांना केवळ सन्मानित करण्यात आले नाही, तर त्यांना त्यांच्या व्यवसायात पुढे जाण्यासाठी एक मजबूत प्लॅटफॉर्म, नेटवर्किंग संधी आणि नवीन दृष्टीकोन देण्याचा प्रयत्न करण्यात आला. यामुळे अनेक उद्योजकांना त्यांच्या व्यवसायात मोठा "ब्रेकथ्रू" मिळण्याची संधी निर्माण झाली आहे. यावेळी बोलताना अध्यक्ष गणेश विटकर म्हणाले, "महिला आणि युवा उद्योजक हे आपल्या समाजाचे भवितव्य आहेत. त्यांना योग्य वेळी प्रोत्साहन आणि सन्मान मिळाला, तर ते नाशिकसह संपूर्ण महाराष्ट्राचे नाव उंचावू शकतात." कार्यक्रमादरम्यान संस्थेतर्फे महिला आणि युवा उद्योजकांसाठी विशेष मार्गदर्शन शिबिरे, व्यवसाय प्रशिक्षण कार्यशाळा आणि नेटवर्किंग प्लॅटफॉर्म सुरू करण्याची घोषणा करण्यात आली. एकूणच, "नाशिक भूषण पुरस्कार सोहळा 2026" हा कार्यक्रम केवळ पुरस्कार वितरणापुरता मर्यादित न राहता, नाशिकला एक उद्योजकीय हब म्हणून ओळख मिळवून देणारा आणि नव्या पिढीला प्रेरणा देणारा भव्य उपक्रम ठरला.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.